ARTHA, Poona 4
Tel. 55627

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80, Licence No. 175

# अर्थ

वर्ष ३४ | पुणे, बुधवार ७ फेब्रुवारी १९६८ | अंक ३



## कोयना भूकंपग्रस्त मदत सहकारी समिती १ कोटी रु. जमविणार

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. वसंतराव दादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली कोयना भूकंपग्रस्त साहाय्यक समितीची स्थापना झाली असून, ह्या समितीने सहकारी क्षेत्रातून भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी एक कोटी रुपयांचा निधी खालीलप्रमाणे गोळा करण्याचा संकल्प सोडला आहे :—

**सहकारी साखरकारखान्यांचे ४५ लक्ष रु.**

( १ ) राज्य व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका १५ लक्ष रु.
( २ ) राज्य व जिल्हा भू-विकास बँका ७॥ लक्ष रु.
( ३ ) राज्य व विभागीय व इतर मार्केटिंग संस्था ७ लक्ष रु.
( ४ ) बृहन्मुंबईतील सहकारी संस्था १० लक्ष रु.
( ५ ) सहकारी साखर कारखाने ४५ लक्ष रु.
( ६ ) प्रक्रिया, औद्योगिक, विमा, अर्बन बँका, इ. १५॥ ल. रु.

या समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे आहेत :—

श्री. गुलाबराव पाटील, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, श्री. जयंतराव भोसले, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ, श्री. जे. एल. मेहता, अध्यक्ष, युनियन को-ऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटी लि., श्री. शामराव कदम, अध्यक्ष, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., श्री. नि. आ. कल्याणी, अध्यक्ष, राज्य भू-विकास बँक, श्री. रघुनाथराव पाटील, अध्यक्ष, राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन, श्री. जवाहरलाल दर्डा, अध्यक्ष, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटी लि., श्री. व्ही. सुब्रह्मण्यम्, निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, श्री. भाऊसाहेब नेवाळकर, सचिव, महाराष्ट्र राज्य भूकंप पुनर्वसन समिती, श्री. ना. श्री. कुलकर्णी, खजिनदार, डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, सचिव.

आतापर्यंत ह्या समितीकडे दहा लक्ष रुपये गोळा झाले आहेत. देणगीदारांची नावे अशी आहेत :—महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (रु. ३ लक्ष), शेतकरी सहकारी साखर कारखाना (रु. ३·४७ लक्ष), राज्य भू-विकास बँक (रु. १ लक्ष), राज्य सहकारी मार्केटिंग फेडरेशन (रु २·५७ लक्ष), परभणी बँक (रु. ७ हजार), अमरावती बँक (रु. ३ हजार), शिवाजी कन्झ्युमर्स सोसायटी, लि. (रु. ५०१), कुंडलवाडी ऑईल मिल (रु. २५१), अमरावती स्पिनिंग मिल. (रु. १०१).

गेल्या हंगामात तयार करण्यात आलेल्या साखरेच्या प्रत्येक पोत्यामागे एक रुपया देण्याचे सहकारी साखर कारखान्यांनी मान्य केले आहे.

### 'लिज्जत' पापड

महिला गृह उद्योग, मुंबई तयार करीत असलेल्या 'लिज्जत' पापडांना विक्रीकर माफ करण्यात आला आहे; उत्पादकांना खादी आणि ग्रामोद्योग कमिशनने मान्यता दिली आहे. गेल्या वर्षी ह्या पापडांची १०·०६ लक्ष रुपयांची विक्री झाली.


समाजशिक्षणमालेचे प्रकाशन

**आपली चलनी नोट**

लेखक : श्री. श्री. वा. काळे. संपादक 'अर्थ'

किंमत ५० पैसे. २०-२-६७ रोजी प्रसिद्ध झाले.



**अधिक धान्योत्पादन! अधिक फायदा!! अधिक बचत!!!**

यांसाठी

किर्लोस्कर

डिझेल एंजिन्स

यांचीच निवड आवश्यक आहे....

कारण, अत्यंत कार्यक्षम व बिनतक्रार चालणारी अशी ही किर्लोस्कर एंजिने, अधिक धान्योत्पादन व अधिक कमाई करण्यास उपयुक्त आहेत. किर्लोस्कर एंजिनें चालविण्यास लागणारा तेलाचा खर्च, इतर एंजिन्सला लागणाऱ्या खर्चाच्या मानाने फारच कमी येतो.




**किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लिमिटेड,**

रजि. ऑफिस-एलफिन्स्टन रोड, पुणें-३ (भारत)

TOM & BAY KO 6606 M

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ७ फेब्रुवारी, १९६८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*


## आर्थिक मंदी चालू राहण्याची शक्यता

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेने सध्याच्या आर्थिक परिस्थितीची पाहणी करून असा निष्कर्ष काढला आहे की, द्रव्यविषयक धोरणात योग्य ते फेरफार करण्यात आले नाहीत तर आर्थिक मंदी १९६८ मध्येही चालू राहण्याची शक्यता आहे. मंदीच्या छायेमुळे आर्थिक विकासावर आणि भांडवलगुंतवणुकीवर अनिष्ट परिणाम झालेला आहे. भाग भांडवल घेण्यास कोणीही उत्सुक नाही. त्यामुळे भांडवल बाजार जवळ जवळ थंडावला आहे, आणि सर्वच उद्योगधंद्यांतील नफा घटत चालला आहे. मंदीची सर्वात अधिक झळ वाहतुकीची साधने निर्माण करणाऱ्या उद्योगधंद्यांना लागली आहे. १९६७ सालात ह्या धंद्यातील उत्पादन २६.२ टक्यांनी घटले आहे. एंजिनिअरिंगच्या कारखान्यांतील उत्पादनात १९.५ टक्के घट झालेली आहे. १९६७ साली निर्माण करण्यात आलेल्या यांत्रिक हत्यारांची किंमत २६ कोटी रुपयांपर्यंत खाली गेली. १९६६ साली त्यांची किंमत ३४ कोटी रुपये झाली होती. एंजिनिअरिंगच्या अनेक छोट्या कारखान्यांना तर काम बंदच ठेवावे लागले. हिंदुस्थान मशीन टूल्स सारख्या मोठ्या संघटनेलाही आपला विस्ताराचा कार्यक्रम कमी करावा लागला. १९६५–६६ साली मालवाहू डबे तयार करणाऱ्या कारखान्यांनी २७ हजार डबे तयार केले होते. परंतु १९६६–६७ मध्ये रेल्वे वाघिणीचे उत्पादन १४,८५६ पर्यंत घसरले. व्यापारी वाहतुकीसाठी लागणाऱ्या मोटार ट्रक्सचे उत्पादन १२ टक्यांनी घटले. तीनचाकी मोटारींच्या उत्पादनातील घट त्यात समाविष्ट नाही. त्याशिवाय एंजिनिअरिंगच्या धंद्यातील प्राथमिक अवस्थेतील मालाचे उत्पादनही घटले आहे.

---

## हिंदमधील एंजिनिअर्सचा परदेशांना लाभ

एंजिनिअरिंगचे उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी भारतात इंडिअन इंस्टिट्यूट ऑफ एंजिनिअरिंगच्या ४ संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत. ह्या संस्थांतून अभ्यास करणारे विद्यार्थी अतिशय हुषार असतात. पण एंजिनिअरिंगचे त्यांचे शिक्षण पुरे झाल्यावर त्यांच्यांतील वरच्या श्रेणीच्या लोकांचा भारताला फायदा होत नाही. ह्या संस्थांतील अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी १५ टक्के विद्यार्थी अधिक उच्च शिक्षणासाठी परदेशांत जातात. पण ते भारतात मात्र परत येत नाहींत. संस्थेत शिक्षण घेणारांपैकी ८४.६ टक्के विद्यार्थी पहिल्या वर्गात पास होतात. अर्थात त्यांचे ज्ञान निरपवाद असते. त्यांच्यापैकी जे विद्यार्थी परदेशांत जातात ते तेथील अभ्यास पुरा केल्यावर तेथेच नौकरी करतात. हिंदच्या विकासासाठी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग होत नाही. अलीकडे एंजिनिअर्ससारख्या कुशल लोकांत सुद्धा बेकारी पसरत चालली आहे. ह्या परिस्थितीची झळ आय. आय. टी मधून बाहेर पडलेल्यांनाही लागली आहे. त्यांच्यापकी २.६ टक्के तज्ज्ञ बेकार आहेत. गेल्या काही वर्षात देशातील अर्थव्यवस्था मंदीच्या भोवऱ्यात सांपडली आहे. त्यामुळे विकासाच्या कामांतील गति मंदावली आहे आणि एंजिनिअर्सना येणारी मागणीही घटली आहे. एंजिनिअर्सना मिळणाऱ्या वेतनाबाबत असे दिसते की, भारतात काम करणाऱ्या एंजिनिअर्सपैकी १८ टक्के पदवीधरांना दरमहा ७०० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळतो आणि १३ टक्के पदवीधरांना ४०० रुपयांपेक्षा कमी पगार मिळतो. परदेशांत गेलेल्या पदवीधरांपैकी ६० टक्के अमेरिकेत, १८ टक्के ब्रिटनमध्ये, १० टक्के कॅनडात आणि ७ टक्के पश्चिम जर्मनीत आहेत.

---

## सहकारी साखर कारखान्यांचा विस्तार

मध्यवर्ती सरकारच्या अन्न व शेतीखात्याने महाराष्ट्रातील सात सरकारी कारखान्यांच्या विस्ताराच्या योजना अमलात आणण्याची शिफारस केली आहे. ह्या कारखान्यांत सांगली, राहुरी आणि अशोक सहकारी कारखान्यांची गणना आहे. सांगली शेतकरी सहकारी कारखान्याने आपले गाळित २,६०० टनांवरून ३,६०० टनांपर्यंत वाढविण्याचे ठरविले आहे. राहुरी आणि अशोक सहकारी कारखान्यांची गाळिताची क्षमता २,००० टनांपर्यंत वाढविण्याची योजना आहे. गुजरात राज्यातील पेटलाड येथील सहकारी कारखान्याच्या स्थापनेलाही मध्यवर्ती सरकार लवकरच मान्यता देणार आहे. त्याचप्रमाणे नागभूमीत एक सहकारी कारखाना काढण्याच्या मागणीलाही मंजुरी देण्यात येणार आहे.

---

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

### १९६७ मधील उल्लेखनीय प्रगति

सातारा येथील युनायटेड वेस्टर्न बँकेने सन १९६७ मध्ये विशेष उल्लेखनीय प्रगती केलेली आहे. बँकेच्या ठेवींमध्ये पंधरा टक्क्यांनी वाढ होऊन त्या आता रु. ६ कोटी, ८२ लाखांचेवर गेल्या आहेत. कर्जव्यवहारातही वाढ झाली असून सालअखेर कर्जव्यवहार रुपये ३ कोटी, ६७ लाख आहे. बँकेचे खेळते भांडवल आता रुपये ७ कोटी, ८५ लाख झालेले आहे.

बँकेच्या नफ्यातही या वर्षी रुपये ६४,००० ने वाढ झाली असून नफा रुपये २,८०,००० झालेला आहे. सदर नफ्यातून नोकरांचे बोनसकरिता रुपये ६४,००० व त्यांचे ग्रॅच्युइटी रिझर्व करिता रुपये ५०,००० वर्ग करण्याचे संचालक मंडळाने ठरविले असून नफ्यातून रु. ५०,००० गंगाजळीकडे वर्ग केले जातील. गेल्या काही वर्षांप्रमाणे बँकेने यंदाही नऊ टक्के (करपात्र) डिव्हिडंड द्यावयाचे ठरविले आहे.

बँकेचे एकूण वसूल भांडवल सालअखेर रुपये १२,८४,००० होत असून गंगाजळी रुपये ९,३२,००० होत आहे.

१९६७ सालात बँकेने पाचगणी, सोलापूर व यावल (जि. जळगाव) येथे तीन नव्या शाखा उघडल्या आहेत, व आता बँकेच्या एकूण २९ शाखा झालेल्या आहेत. लवकरच औरंगाबाद व अन्यत्र बँकेच्या शाखा उघडल्या जातील.

संचालक मंडळाचे अध्यक्ष म्हणून श्री. रा. ना. गोडबोले व जनरल मॅनेजर म्हणून श्री. वि. श्री. दामले हे काम पाहात असून ते दोघेजण यापुढेही त्याच पदावरून काम पाहतील.

महाराष्ट्रातील एक नामवंत बँक म्हणून बँकेने आजपर्यंतच्या मिळविलेल्या लौकिकात तिच्या १९६७ सालातील विशेष प्रगतीने भरच पडलेली आहे.

---

## रशिआतील जीवनमान सुधारत चालले

रशिया आणि पाश्चिमात्य देश ह्यांतील लोकांच्या राहणीच्या मानात अजून तफावत असली तरी ती कमी करण्याच्या प्रयत्नात रशियाला यश येत आहे. आगामी काळात ही तफावत आणखीच कमी होत जाईल असे दिसते. रशिआत कम्युनिस्ट राजवट आल्यापासून अवजड उद्योगधंद्यांच्या उभारणीकडे सतत अधिक लक्ष पुरविण्यात आले, पण त्यामुळे रोजच्या गरजेच्या मालाचे उत्पादन गरजा भागविण्याइतके होऊ शकत नव्हते. आता मात्र गरजेच्या वस्तू निर्माण करणाऱ्या उद्योगधंद्यांना प्राधान्य देण्यात येत आहे. त्यामुळे रशिअन लोकांचे जीवन अधिक समृद्ध होत चालले आहे. कपडे, बूट, खाण्याच्या विविध वस्तू अधिक मुबलक प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्या आहेत तथापि त्यांच्या वाटपाची व्यवस्था अजून नीट झालेली नाही.

## स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या आणखी परदेशीय कचेऱ्या

भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनने आणखी काही देशांत नव्याने कचेऱ्या उघडण्याचे ठरविले आहे. बँकॉक, बैरूट, कैरो, लॅगॉस, तेहरान आणि काबूल ह्या ठिकाणी त्या स्थापन करण्यात येणार आहेत. ह्या संघटनेच्या परदेशी कचेऱ्या नाहीत असे नाही. परंतु त्या मुख्यतः पूर्व युरोपातील देशांत म्हणजे झेकोस्लोव्हाकिआ, रूमेनिया आणि पूर्व जर्मनी ह्या देशांत आहेत. कारण, संघटनेतर्फे चालणारा बराच व्यापार पूर्व युरोपातील कम्युनिस्ट देशांशी चालतो. कम्युनिस्ट देश सोडून हॉलंड व कॅनडा या देशांतही कचेऱ्या आहेत. १९५६ साली संघटनेची स्थापना झाल्यापासून तिने चांगले कार्य केले आहे. भारताकडून नेहमी निर्यात होणाऱ्या वस्तूंखेरीज माणसाचे केस, केळी, फळांचे रस, इत्यादी वस्तूही नव्याने निर्यात करण्यात कॉर्पोरेशनने यश मिळविले आहे. त्याशिवाय हिंदमध्ये तयार होणाऱ्या बुटांना रशिया, पूर्व युरोप, अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांत बाजारपेठ मिळवून देण्यात आली आहे. ४थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस सुमारे १० कोटी रुपयांची फळे व फळांचे रस निर्यात करणे कॉर्पोरेशनला जमेल असा अंदाज आहे. भारतामधून फुले आणि भाजीपाला निर्यात करण्यास चांगला वाव आहे असे सांगण्यात येत आहे. बंगालमधील दार्जिलिंग आणि कॉलिंपाँग-सारख्या थंड हवेच्या ठिकाणी आढळणारी अनेक प्रकारची रंगीबेरंगी फुले आजही विमानाने अमेरिकेला पाठविण्यात येत आहेत आणि ती तिकडे चांगली खपतही आहेत. शेजारच्या आणखी काही देशांतही त्यांना बाजारपेठ मिळण्यासारखी आहे.

---

## हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज ॲन्ड इनव्हेस्टमेंट लि.

हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज ॲंड इनव्हेस्टमेंट लि., नागपूर, ह्या कंपनीने एका वैशिष्ट्यपूर्ण क्षेत्रात विशेष कामगिरी चालविली आहे. घरे बांधणे, घरे खरीदणे, घरांची दुरुस्ती करणे, त्याचप्रमाणे व्यापार-उद्योग ह्यांस तारणावर कर्ज देणे व त्यासाठी भागधारकाकडूनच फक्त ठेवी घेणे, हा ह्या कंपनीचा प्रमुख व्यवहार आहे. त्याप्रमाणे भरपूर रकमा तरत्या ठेवून, कंपनीने २१ लक्ष, ६७ हजार रु. कर्जव्यवहारात गुंतविलेले आहेत. "हाउस फायनॅन्स" हा कंपनीचा मुख्य व्यवसाय असल्याकारणाने एकूण ठेवींच्या कमाल मर्यादेचा रिझर्व्ह बँकेने बिगर-बँकिंग कंपन्यावर घातलेला निर्बंध 'हिंदफिन' ला लागू नाही, पण ठेवींचे प्रकार बदलावे लागले आहेत. कंपनीचे वसूल भांडवल ३,६३,२०० रु. असून तिने ठेवीच्या व इतर मार्गे २९ लक्ष रु. घेतलेले आहेत. कंपनीला गेल्या वर्षी ७०,८०२ रु. नफा झाला. त्यापैकी ४५,००० रु. ची करासाठी तरतूद करून करपात्र ७½% डिव्हिडंडसाठी २५,९५० रु. चा विनियोग करण्यात आला.

---

# व्यापारी बँकांचा शेतीसाठी कर्जपुरवठा

## भरपूर वाव; कर्ज अप्रत्यक्षरीत्या देणे उभयपक्षी हिताचे; एकसूत्रीपणा आवश्यक

लेखक:-श्री. रामराव मा. चव्हाण, एलएल. बी.,
चेअरमन, अहमदनगर जि. स. भू-विकास बँक लि., अहमदनगर

भारताचे उपपंतप्रधान व अर्थमंत्री नामदार श्री. मोरारजीभाई देसाई यांनी लोकसभेत बँकांच्या सामाजिक नियंत्रणाबाबत जे निवेदन केले आहे ते अभ्यसनीय व चिंतनीय आहे. भारताची मध्यवर्ती बँक-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया-या बँकेस फार मोलाची व महत्त्वाची कामगिरी बजावावी लागणार आहे. सामाजिक नियंत्रणाची सूत्रे या बँकेमार्फत हलविली जातील हेहि स्पष्ट आहे. सामाजिक नियंत्रण म्हणून व्यापारी बँकांनी आपल्या पैशाचा ओघ काही प्रमाणात शेती व्यवसायाकडे वळविला आहे. काही व्यापारी बँकांनी शेती सुधारण्यासाठी कर्जे देण्यास सुरुवात केलेली आहे. खरा प्रश्न आहे तो व्यापारी बँकांचा पैसा शेती व्यवसायात कशा रीतीने उपलब्ध करावयाचा.

महाराष्ट्रापुरते पाहावयाचे झाल्यास शेतीला पैसा सहकारी संस्थांमार्फत पुरविला जात आहे. राज्य पातळीवरील महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक, जिल्हा पातळीवर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व जिल्हा सहकारी भू-विकास बँका, गावच्या पातळीवर विविध कार्यकारी सोसायट्यांच्यामार्फत पैशाचा पुरवठा होतो. याशिवाय कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करण्यासाठी सहकारी साखर कारखाने, जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीज, तेलगिरण्या स्थापन झालेल्या आहेत. शेतकरी हा केवळ कच्चा माल उत्पन्न करणारा शेतकरी राहून उपयोगी नाही तर तो कारखानदार झाला पाहिजे. त्याला त्याने उत्पन्न केलेल्या मालाचा पुरेपूर मोबदला मिळाला पाहिजे. या पवित्र भावनेने सहकारी संघटना आपापल्या परीने कार्य करीत आहेत. कच्चा माल किंवा पक्का माल ग्राहकापर्यंत पोहोचविण्यासाठी मार्केटिंग सोसायट्या व सहकारी ग्राहक भांडारे उघडली गेली आहेत. या सर्व घटना आशादायी व शुभफलदायी आहेत यात शंका नाही. परंतु हे सर्व करीत असताना ज्या सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेल्या आहेत त्यांच्या स्थैर्याचा विचार होणे आवश्यक आहे.

शेतीसाठी दोन तऱ्हेने पैसा लागतो. शेतीच्या मशागतीकरिता अल्प मुदतीचा व शेतीच्या कायम विकासासाठी दीर्घ मुदतीचा पहिल्या प्रकारचा पतपुरवठा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, गावच्या सोसायट्यांमार्फत करीत असतात; व दुसऱ्या प्रकारचा पतपुरवठा बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँक जिल्हा भू-विकास बँकांमार्फत करीत असते.

बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह लॅण्ड मॉर्गेज बँक लि. मुंबई किंवा प्राथमिक भू-विकास बँका यांना ठेवीच्या रूपाने पैसा गोळा करता येत नाही. शिखर बँकेला हा पैसा रिझर्व्ह बँक व प्रांतिक सरकार यांच्या संमतीने वेळोवेळी ऋणपत्रे (कर्जरोखे) विक्रीस काढून उभारावा लागतो. अशा प्रकारच्या ऋणपत्रास-त्याच्या व्याज व मुद्दलास-राज्य सरकारची हमी असते. त्यामुळे कर्जउभारणीस फारशी अडचण पडत नाही. तथापि या रीतीने उभारला जाणारा पैसा हा अपुरा पडतो.

कर्जरोखे विक्रीस काढल्यानंतर प्रत्येक श्रेणीत भरपाई खालील प्रमाणात करण्यात येते.

| | | |
|---|---|---|
| (१ | लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया | ३० टक्के |
| (२) | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया | २० टक्के |
| (३) | स्टेट बँक ऑफ इंडिया | १० टक्के |
| (४) | कर्जरोख्यांची खुल्या बाजारात विक्री | ४० टक्के |
| | एकूण | १०० टक्के |

या ठिकाणी व्यापारी बँकांना आपला पैसा गुंतविण्यास भरपूर प्रमाणात वाव आहे. त्याबाबतीत निष्कर्ष काढण्यापूर्वी व्यापारी बँका शेती व्यवसायासाठी कशा रीतीने कर्जपुरवठा करू शकतील ते पाहू या.

या बाबतीत भारत सरकारच्या परिपत्रक क्रमांक ३-१७-६६ क्रेडिट दिनांक १६-९-६७ कडे लक्ष वेधू इच्छितो.

व्यापारी बँकांना शेती व्यवसायासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने कर्जपुरवठा करता येईल.

(१) राज्य सरकार व रिझर्व बँक ऑफ इंडिया यांच्या संमतीने राज्य भू-तारण-बँका वेळोवेळी ऋणपत्रे उभारतात ती विकत घेऊन.

(२) राज्य सहकारी बँका, राज्य भू-तारण बँका, जिल्हा सहकारी बँका यांना तात्पुरता कर्जपुरवठा मंजूर करून. (ओव्हर ड्राफ्टस).

(३) तयार झालेल्या पक्क्या मालाच्या तारणावर क्रेडिट्स मंजूर करून.

(४) स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डस, विद्युतीकरणाची जाळी राज्यांत उभारून ग्रामीण विभागात शेतीसाठी विद्युतपुरवठा उपलब्ध करून देत आहेत. अशा इलेक्ट्रिसिटी बोर्डाचे कर्जरोखे विकत घेऊन.

(५) प्रत्यक्ष शेतकऱ्यांना जमिनीच्या मशागतीकरता व विकासाकरिता कर्जे मंजूर करून.

(६) बी–बियाणे, खते, रासायनिक द्रव्ये, शेती-अवजारे विकत घेण्यासाठी खरेदी-विक्री संघांना कर्जपुरवठा करून.

(७) जलसिंचनाच्या, पाणी पुरवठ्याच्या व तलावांच्या मोठ्या योजना हाती घेऊन अथवा ज्या यंत्रणा हाती घेतात त्यांना कर्जपुरवठा करून.

वरील कारणांसाठी व्यापारी बँका कर्जपुरवठा करू शकतील इतकेच नव्हे तर काही व्यापारी बँकांना तशा प्रकारे कर्ज-पुरवठा करण्यास प्रारंभ केलेला आहे.

दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा राज्य भू-तारण बँक ही जिल्हा भू-विकास बँकांमार्फत करीत आहे.

नवीन विहीरी खणणे, जुन्या विहीरींची दुरुस्ती करणे, ऑईल एंजिन्स, पंपिंग सेटस खरेदी करणे, जमिनीला ताली घालणे, बांधबंदिस्ती करणे, ट्रॅक्टर्स खरेदी करणे इत्यादी कारणां-करिता भू-विकास बँक कर्जपुरवठा करते. हा सर्व पैसा भांडवली स्वरूपाचा असतो.

जिल्हा मध्यवर्ती बँका शेतकऱ्यांना मध्यम मुदतीची कर्जे देत आहेत. हाही पैसा भांडवली खर्चातच गणला जातो.

राज्यात गावच्या पातळीवर सहकारी सोसायट्यांचे जाळे विणले गेले आहे. त्यामुळे शेतीच्या मशागतीकरिता पीक कर्ज मिळण्याची व्यवस्था झालेली आहे.

शेतीच्या विकासाकरिता दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठ्यासाठी लागणारी यंत्रणा व शेतीच्या मशागतीकरिता अल्प मुदतीच्या कर्जपुरवठ्यासाठी लागणारी यंत्रणा, दोन्हीही यंत्रणा सज्ज असून कार्यान्वित आहेत. या पार्श्वभूमीवर व्यापारी बँकांच्या कर्जपुरवठ्याचा विचार केला पाहिजे.

शेतीविकासास भरपूर प्रमाणात कर्जपुरवठा लागतो. तो कितीही एजन्सीमार्फत मिळाला तरी हवा आहे. प्रश्न आहे तो एकसूत्रीपणाचा. शेतकऱ्यांना जर जास्त एजन्सीमार्फत पैसा मिळू लागला तर त्याच्या परतफेडीच्या पात्रतेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहेच. शिवाय पैशाच्या योग्य वापराबाबत साशंकता निर्माण होण्याची शक्यता आहे. यासाठी एकाच यंत्रणेमार्फत कर्ज वाटप करणे श्रेयस्कर ठरते.

व्यापारी बँकांनी शेती व्यवसायात लक्ष घालावे. भरपूर प्रमाणात कर्जपुरवठा उपलब्ध करून अन्नधान्योत्पादनास हातभार लावावा. आपल्या शेतीप्रधान देशात व्यापारी बँकांच्या आर्थिक साहाय्याची गरज निश्चित आहे. फक्त त्यांनी कर्जपुरवठा अप्रत्यक्षपणे करावा.

त्याच्या पुष्ट्यर्थ खालील मुद्दे विचारात घ्यावेत.

(१) आज जिल्हा सहकारी बँका व भू-विकास बँकांची यंत्रणा तयार आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व जिल्हा प्राथमिक भू-विकास बँका उत्तम रीतीने कार्य करीत आहेत. कर्ज-वसुलीसाठी यंत्रणा तयार आहे. अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जवाटपाचे लक्ष्य व साध्य सातत्याने चालू आहे.

(२) व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जे न वाटता तो पैसा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व भू-विकास बँकां-मार्फत वाटावा. त्यायोगे वाटप व विनियोग आणि वसुली यात एकसूत्रीपणा राहून गरजू शेतकऱ्यांच्या गरजा व्यवस्थितपणे भागविल्या जातील. यासाठी व्यापारी बँकांनी राज्य भू-तारण बँकांची ऋणपत्रे (कर्जरोखे) मोठ्या प्रमाणात व जास्त रकमेने खरेदी करावेत. यामुळे राज्य शिखर बँकेकडे भरपूर प्रमाणात पैसा उपलब्ध होईल. शिवाय व्यापारी बँकांच्या वसुलीस काहीही त्रास पडणार नाही. कर्जवसुलीची यंत्रणा जिल्हा पातळीवरील बँकांकडे तयार आहेच.

(३) राज्य सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने आणि संमतीने व्यापारी बँकांनी राज्य सहकारी बँकांना व जिल्हा सहकारी बँकांना वेळोवेळी गरजेनुसार टेम्पररी ओव्हर ड्राफ्टस मंजूर करावेत. आर्थिक बाजारातील घडा-मोडी लक्षात घेऊन मंजूर केलेले ओव्हर ड्राफ्टस शेती व्यवसा-याला उपकारक ठरतील. तसेच सहकारी संस्थेच्या भाग भांडव-लात पैसा गुंतवावा.

सहकारी साखर कारखाने, जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीज, जिल्हा खरेदी संघ यांना मालाच्या तारणावर लाखाच्या पुढील रकमां-करिता क्रेडिटस मंजूर करून पैसा उपलब्ध करून देण्याचे काम व्यापारी बँकांना करता येणे शक्य आहे.

(५) स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड वेळोवेळी जी कर्जे उभारील त्यास मुक्त हस्ते आर्थिक साहाय्य द्यावे.

(६) व्यापारी बँकांनी काही टक्के पैसा शेतीचे विकासासाठी व लघूद्योग धंद्यासाठी राखून ठेवण्यात यावा. अशा प्रकारे व्यापारी बँकांनी शेती व्यवसायासाठी अप्रत्यक्षपणे कर्जपुरवठा करावा. त्यामुळे त्यांच्या वसुलीस अडथळा येणार नाहीच. शिवाय राज्य पातळीवरील सहकारी बँका व संस्था यांना स्थैर्य लाभेल. तसेच शेतीचे कर्जपुरवठ्यामध्ये एकसूत्रीपणा राहील.

---

### बँकांच्या कर्जविषयक धोरणाचे स्वरूप

रिझर्व बँकेच्या गव्हर्नरांनी हिंदी आणि परदेशी बँकांच्या प्रतिनिधींच्या बैठकीत बँकिंगच्या सद्यःस्थितीचा आढावा घेतला आणि मार्गदर्शन केले. गेल्या वर्षाच्या मानाने कर्जांना मागणी कमी आहे आणि ठेवींतील वाढीची गती समाधान-कारक आहे. निर्गत, शेतीसाठी खते, जंतुनाशके आणि लघु-उद्योग ह्यांना कर्जपुरवठा कमी दराने भरपूर व्हावा, ह्या दृष्टीने धोरण ठेवण्यात आले आहे. तथापि, पी. एल. ४८० खालील आयातीसाठी आणि कर भरण्यासाठी बराच पैसा बँकांना उपलब्ध करावा लागेल, त्याची तरतूद करून ठेवणे आवश्यक आहे. उत्पादक घटकांची कर्जाचे अभावी कुंचबणा होऊ दिली जाणार नाही; रिझर्व बँक स्वस्त व्याजाने पैसा देईल.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

दि. ३१ डिसेंबर १९६७ रोजीं पुऱ्या झालेल्या वर्षाअखेर सर्व खर्चवेच वजा जाता व प्राप्तिकर आणि इतर नित्याच्या आवश्यक त्या तरतुदी केल्यानंतर हिशेबतपासनिसांचे अहवालापूर्वी वरील बँकेला रु. २० लाख, ९९ हजार निवळ नफा झालेला आहे. सदर रकमेत मागील वर्षातील पुढे ओढलेली रु. एक हजार रकम धरून हा नफा रु. २१ लाख इतका होतो. या रकमेची विभागणी खालीलप्रमाणे करण्याचे संचालक मंडळाने ठरविले आहे.

गंगाजळी म्हणून रु. ४ लाख २० हजार, लाभांश निधि म्हणून ११ लाख ७५ हजार व नोकरवर्गाच्या निवृत्ती वेतनासाठी रु. ५० हजार आणि नोकरवर्गास द्यावयाचे बोनस रकमेचा समावेश करून पुढील वर्षासाठी ओढलेली रक्कम रु. ४ लाख ५५ हजार. १९६६ सालात हेच आकडे अनुक्रमे ३ लाख ५५ हजार, १० लाख व ५० हजार असे होते.

वसूल भांडवल, ठेवी व गुंतवणूक यांतहि अहवालाच्या साली उल्लेखनीय अशी प्रगति झालेली आहे. वसूल भांडवल व गंगाजळी १९६४ साली ११३·२९ लक्ष रुपये होती. ती १९६७ साली १८७·९१ लाख रुपये झाली आहे. ठेवीची रक्कम ३६६२·९२ लाख रुपयांवरून ६२५० लाख रुपयांवर आलेली आहे. गंतवणूक १९६४ मध्ये १६३६·२६ लाख रुपये होती ती १९६७ साली २१७३·८४ लाख रुपये इतकी झाली आहे. सांप्रत एकूण भागधारक ९,२०० असून ठेवीदारांची संख्या चार लाखांवर आहे. भागधारकांना मंडळाने या वर्षासाठी गतवर्षीप्रमाणेच पण वाढलेल्या भांडवलावर भरलेल्या रकमेच्या प्रमाणांत १० टक्के लाभांश द्यावा असे सुचविले आहे.

सांप्रत बँकेच्या ११९ शाखा आहेत.

### समुद्राचे पाणी औषध म्हणून विकले

व्हिएटनाममधील सैनिकांसाठी इटलीमधील एका औषधी कंपनीने गेल्या दोन वर्षात औषधी अम्प्यूल्स पुरविली, त्यांत औषध नसून समुद्राचे पाणी भरलेले होते, असे आढळून आले आहे. "फिजिऑलॉजिकल सोडियम क्लोराइड" ह्या नावाने ते पाणी विकत घेण्यात आले.

### भूकंपग्रस्तांसाठी जपान पत्रे देणार


कोयनानगरच्या भूकंपग्रस्तांच्या घरबांधणीसाठी जपानी सरकारने ११,००० लोखंडी पत्रे देण्याचे ठरविले आहे. हे पत्रे मार्चअखेर मुंबईला येऊन दाखल होतील.

### कुटुंबनियोजनासाठी अमेरिकेची मदत

कुटुंबनियोजनासाठी भारताला अमेरिकेने तीन कोटी रुपयांची मदत देण्याचे जाहीर केले आहे.

श्री. वा. काळे ह्यांची
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तके
१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,
३ तुमचे स्थान कोणते ?

सरदारगृह
मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.
— आमची वैशिष्ट्ये —
* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.
फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग

तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्


१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग — सांगली (महाराष्ट्र)

# लहान जॉइंट स्टॉक कंपन्यांबाबतचा सरकारी दृष्टिकोण सुधारण्याची आवश्यकता

**"हिंदफिन"च मॅनेजिंग डायरेक्टर श्री. श्रौती ह्यांचा आढावा**

हिंद फिनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इनव्हेस्टमेंटस लि., चे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. गो. रा. श्रौती ह्यांनी दि. २९-१२-१९६७ रोजी वार्षिक साधारण सभेत केलेल्या भाषणांत चांगल्या तऱ्हेने चालविण्यात यणाऱ्या लहान कंपन्यांना सरकारकडून नीट वागणूक मिळत नाही, अशी तक्रार केली. ते आपल्या भाषणात म्हणाले :—

देशातील आर्थिक व्यवहाराचे नियमन करणारी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही मध्यवर्ती संस्था आहे व त्या नात्याने ठेवीदारांच्या हितसंबंधाची जपणूक करण्याचा त्या संस्थेस पूर्ण अधिकार आहे, नव्हे तशी जपणूक त्या संस्थेने अवश्य केलीच पाहिजे. परंतु आपल्या कंपनीसारख्या सतत मुनाफ्यात चालणाऱ्या, हिस्सेदारास सतत मुनाफा वाटणाऱ्या, मुख्यतः हिस्सेदाराकडूनच ठेवी स्वीकारणाऱ्या व आर्थिकदृष्ट्या बळकट असणाऱ्या संस्थांकडे त्यांनी जास्त व्यापक दृष्टिकोणातून बघावयास पाहिजे असा माझा आग्रह आहे. ठेवी स्वीकारणाऱ्या कंपन्यांच्या हिशेबाची तपासणी करून वरील निकषास उतरणाऱ्या कंपन्यांनाच ठेवी स्वीकारण्याची परवानगी देणे हाच ठेवीदारांचे हितसंबंध जपण्याचा एकमेव उत्कृष्ट मार्ग आहे.

"गृहबांधणीसाठी कर्ज" हा आपल्या कंपनीचा मुख्य धंदा आहे. ह्या धंद्यामुळे, एका महत्त्वाच्या आर्थिक व सामाजिक स्वरूपाचा प्रश्न सोडविण्यास आपण समाजास साहाय्यभूत होत आहोत. ह्यासाठी हिस्सेदारांनी त्यांच्याच कंपनीकडे ठेविलेल्या कोणत्याही मुदतीची लहानसेमोठी ठेव गृहबांधणीचा प्रश्न सोडविण्यास साहाय्यभूत होत असते. तेव्हा हिस्सेदारांच्या ठेवीवर कोणतेही निर्बंध असू नयेत.

आपले सरकार समाजवादी अर्थव्यवस्थेच्या धोरणाचा पुरस्कार करणारे आहे. ह्याचा अर्थ समाजातील सर्व घटकांस समान संधी देऊन दुसऱ्याचे शोषण न करता, त्यांना आपली आर्थिक उन्नती करून घेण्याचे स्वातंत्र्य होय, असा मी समजतो. ह्याच विचाराने प्रेरित होऊन सरकारने सहकारी संघटनेला प्रामुख्याने चालना देण्याचे व सहकारी संस्थांना स्थापनेपासून तो भांडवलपुरवठ्यापर्यंत सर्व सवलती उदारतेने देण्याचे धोरण अवलंबिले आहे. कराच्या अवास्तव बोजापासून ह्या सहकारी संघटना बऱ्याचशा मुक्तही आहेत. परंतु समाजातील ह्या आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या घटकांनी जर एखादी जॉइंट स्टॉक कंपनी काढून त्याद्वारे सहकारी तत्त्वांना अनुसरूनच जर आपली आर्थिक उन्नती करून घेण्याचे ठरविले तर सर्व सवलती नाहीशा होऊन, मध्यवर्ती सरकारच्या बेसुमार ओझ्याखाली त्या दडपल्या जातात. बदलत्या काळाबरोबर सरकारने लहान जॉइंट स्टॉक कंपन्याबाबत आपली दूषित विचारसरणी बदलून त्यांचे कारभाराकडे जास्त न्यायोचित दृष्टीने पाहावे अशी माझी विनंती आहे. अशा प्रकारच्या लहान कंपन्या प्रादेशिक गरज भागविण्याच्या दृष्टीने व मोठ्या संस्थांची मक्तेदारी नाहीशी करण्याचे दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाच्या आहेत. तेव्हा त्याच्या पोषणास व वाढीस योग्य ते वातावरण असणे हे समाजाच्या हिताचे आहे. लहान कंपन्यांच्या हिस्सेदारांच्या वैयक्तिक उत्पन्नाची चाचणी केली तर ५५ प्रतिशत करपात्र उत्पन्न असणारा एकही हिस्सेदार त्यात आढळणार नाही. तेव्हा अशा हिस्सेदारांच्या कंपन्यांना मात्र ५५ प्रतिशत कर आकारणे कितपत सयुक्तिक आहे ह्याचा विचार व्हावा.

ह्याच अनुषंगाने हिस्स्यारील नफ्याचे २२ प्रतिशत कर कापून घेण्याचे इन्कमटॅक्समधील तरतुदीकडेही लक्ष देणे भाग आहे. ह्या लहान कंपन्यांचे हिस्सेदार करपात्र उत्पन्न नसणारेच असतात. कायद्यामध्ये अशा हिस्सेदारांना, इन्कमटॅक्स कचेरीतून प्रमाणपत्र घेऊन इन्कमटॅक्स न कापता हिश्यावरील नफा घेण्याची सोय उपलब्ध आहे हे खरे. परंतु हे काम किती त्रासाचे आहे हे लक्षात घेता इन्कमटॅक्स अधिकाऱ्याकडून प्रमाणपत्र न घेणे हिस्सेदारांस जास्त सोईचे व फायद्याचे वाटते. रु. ५० चे हिस्स्यावर रु. ७·५० प्रतिशत दराने मुनाफा ३·७५ होतो. ह्यावर २२ प्रतिशत दराने रु. ०·७१ पैसे कर कापून रु. ३·०४ हिस्सेदाराच्या पदरात पडावयाचे. ह्या ०·७१ पैशाचे बचतीसाठी वाहनखर्च करून २ वर्षासाठी कर न कापावयाचे प्रमाणपत्र आणणे फायदेशीर कसे पडणार? व जर का दोन वेळा किंवा अधिक वेळा जावे लागले तर हा नुकसानीचाच व्यवहार होणार.

राष्ट्राची आर्थिक स्थिती सुधारून, राष्ट्रीय उत्पन्नात भर पडावयाची असेल तर बचतीस व गुंतवणुकीस पोषक असे वातावरण तयार करण्याचे मार्ग अवलंबिले पाहिजेत. आपल्या कंपनीसारख्या लहान कंपन्यांकडे जास्त सहानुभूतीचा दृष्टिकोण ठेवून लहान कंपन्यांचे उत्पन्नावर फक्त न्यायोचित (व त्यांचे वाढीस हानिकारक होणार नाही इतपतच) कराची आकारणी केली पाहिजे.

सरकारी कायद्यानुसार मजुरास त्याची उचित मजुरी व बोनस मिळण्याची तरतूद आहे. शासनास कंपन्यांचे मुनाफ्यापैकी ५५ प्रतिशत इतका मुनाफा सक्तीने मिळण्याची तरतूद आहे. परंतु हिस्सेदारास मात्र त्याने गुंतविलेल्या लाभ किंवा हानी (रिस्क कॅपिटल) भांडवलावर योग्य तो मोबदला मिळण्याची कायद्यात कोठेच तरतूद नाही.

## राष्ट्रपतिभवनावर होणाऱ्या खर्चात वाढ

दिल्लीतील राष्ट्रपतिभवन म्हणजे जगातील एक भव्य आणि विस्तीर्ण राजवाडाच आहे. त्याची शान राखण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. देशातील सध्याची तंगीची परिस्थिती लक्षात घेऊन राष्ट्रपतिभवनात काम करणाऱ्या नोकरांची संख्या कमी करण्यात आली आहे. त्याशिवाय पाव्हण्यांची बरदास्त ठेवण्यातही काटकसर करण्यात येत आहे. तरीसुद्धा किंमती वाढत चालल्यामुळे तेथील जाम्यानिम्यावर होणारा खर्च फुगत चालला आहे. राष्ट्रपतिभवनाचे अंदाजपत्रक सालीना ३६ लाख रुपयांचे आहे. गेल्या वर्षीचे अंदाजपत्रक ३३ लाखांचे होते. त्यांतील २६ लाखांची रक्कम लष्करी चिटणिसाच्या कचेरीसाठी आणि ६ लाखांची रक्कम राष्ट्रपतीच्या कचेरीसाठी होती. तथापि, अंदाजपत्रकापेक्षा कितीतरी अधिक पैसे खर्च होत असतात. राष्ट्रपतिभवनांत काम करणाऱ्या लष्कराच्या नोकरांचे पगार संरक्षणखाते देत असते. भवनातील इमारती सुस्थितीत राखण्यासाठी मध्यवर्ती बांधकाम खात्याचे लोक असतात. त्यांचा पगार ते खाते देते. बांधकाम खात्याच्या लोकांत बरेच एंजिनिअर्स आहेत. बागेत काम करणाऱ्या माळ्यांची संख्या ५०० आहे. राष्ट्रपतिभवनात अनेक परदेशी पाहुणे येतात. त्यांच्या आगतस्वागताचा खर्च परराष्ट्रीय खाते करीत असते. निरनिराळी सरकारी खाती अधून मधून स्वागत-समारंभ करीत असतात. त्यांचा खर्च ते ते खाते देते. समारंभ मात्र भवनात करण्यात येतो. अशा रीतीने अंदाजपत्रकाबाहेर होणारा खर्च बराच असल्यामुळे राष्ट्रपतिभवनावर होणाऱ्या खर्चाचा नक्की आकडा काढणे कठीणच आहे.

भवनाच्या मुख्य इमारतीत ४४५ दालने आहेत. त्यापैकी १४५ दालने भारत सरकारच्या निरनिराळ्या कचेऱ्यांना दिलेली आहेत. ७९ दालनांत राष्ट्रपतींच्या कचेरीचे काम चालते. राष्ट्रपतिभवनात राहण्याच्या सोयी असलेली ६३ दालने आहेत. त्यापैकी ३ राहण्याच्या जागा सध्याचे अध्यक्ष आपल्या कुटुंबासाठी वापरतात. २३ दालने पाहुण्यांसाठी आहेत. आणि १८ दालने नोकर राहण्यासाठी वापरतात. भवनात काम करणाऱ्या नोकरांची संख्या १ हजार आहे. परंतु त्या सर्वांचे पगार राष्ट्रपतिभवनाच्या अंदाजपत्रकांतून दिले जात नाहीत. सुमारे १०-१५ वर्षांपूर्वी राष्ट्रपतिभवनात दिले जाणारे खाने बरेच खर्चिक असत. पण अलीकडे स्वागतसभारंभांत देण्यात येणाऱ्या पदार्थांवरील खर्चात कपात करणात आली आहे. अशा समारंभांतून आता चहा, बटाट्याचे काप, दाणे, असे साधे पदार्थ देण्यात येतात. परदेशी राजप्रतिनिधींनाही दुसरे काही दिले जात नाही. भोजनसभारंभ असला तर मात्र गोष्ट वेगळी. परदेशी अतिथी म्हटले म्हणजे मद्य देणे ओघानेच येते. परंतु ह्या मद्यावरील खर्च परराष्ट्रीय खात्यामार्फत भागविला जातो. तथापि, मद्य पिण्यावर बरीच बंधने आहेत. त्यामुळे त्याच्या वापरावर मर्यादा पडलेली आहे. पाहुण्यांना मद्य द्यावयाचे असल्यास त्यांनी ते आपल्या खोलीत द्यावे, बाहेर आणून घेऊ नये, असा एक निर्बंध आहे. प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिन ह्या दोन दिवशी राष्ट्राध्यक्ष सार्वजनिक स्वागतसभारंभ साजरा करतात. ह्या दोन्ही दिवशी सुमारे ६,००० पाहुण्यांना आमंत्रणे दिलेली असतात. पाहुण्यांची संख्या मोठी असल्यामुळे हे दोन्ही सभारंभ एका दिवसात उरकणे शक्य नसते म्हणून ते दोन दिवस चालतात.

## भाषिक वाद आणि सिनेमाच्या जाहिराती

मुंबईमधील चित्रपटनिर्मात्यांपुढे एक नवा प्रश्न उभा राहिला आहे. तामीळनाडमध्ये हिंदी भाषेतील चित्रपट दाखविणाऱ्या चित्रपटगृहांना कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. कारण, हिंदी चित्रपट दाखविण्यास विरोध करण्यात येत आहे. उत्तर भारतात वेगळी परिस्थिती आहे. तेथील हिंदीप्रेमी लोक हिंदी चित्रपटांच्या जाहिराती व इतर भित्तिपत्रके देवनागरी लिपीत तयार केलेली असली पाहिजेत असा प्रचार करीत आहेत. सध्या हे साहित्य रोमन लिपीत छापलेले असते. चित्रपटनिर्मात्यांनी उत्तर भारतीयांची मागणी पुरी करण्याचे ठरविल्यास त्यांना जादा खर्चाचा बोजा स्वीकारावा लागेल. भारताच्या माहिती आणि नभोवाणी खात्याने हिंदी चित्रपटांची पडद्यावरील भाषा देवनागरी लिपीत असावी अशी सूचना केली आहे. पण निर्मात्यांना ती अव्यवहार्य वाटते.

## सिंधु संस्कृतीच्या लिपीचा उलगडा

मोहेंजोदारो आणि हडाप्पा येथील प्राचीन संस्कृतीचा शोध लागून ४० वर्षांवर काळ लोटलेला आहे. अलीकडे राजस्थान आणि गुजरातमध्येही ह्या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. ह्या अवशेषात काही एका प्रकारची लिपी आढळून येते, पण ती वाचण्याच्या कामी यश आलेले नव्हते. आग्नेय रशिआत अशा प्रकारची लिपी असलेले काही अवशेष सापडले असून ह्या लिपीचा उलगडा कॉम्प्युटरच्या साह्याने लावल्याचा दावा रशिअन शास्त्रज्ञांनी केला आहे. सिंधु संस्कृतीची लिपी चित्रलिपी आहे की उजवीकडून डावीकडे लिहिण्यात येणारी आहे, त्यावर आता प्रकाश पडण्याची शक्यता आहे. सिंधु संस्कृतीच्या काही मुद्रांत शिवमूर्तीचा ठसा असल्याचे सांगण्यात येत आहे.

## हिवतापविरुद्ध मोहिमेत अडचणी

भारतात चालू झालेल्या हिवतापविरोधी मोहिमेला १९६७ अखेर १० वर्षे पूर्ण झाली. गेल्या तीन वर्षात मोहिमेसाठी लागणारी औषधे, वाहतुकीच्या सोई आणि काम करणारी माणसे ह्या सर्वांचाच तुटवडा भासत आहे. परिणामी, ही मोहीम योग्य रीतीने चालविण्यात अडचणी येत आहेत.

## मंदीमुळे रेल्वेच्या उत्पन्नात झालेली घट

देशातील आर्थिक व्यवहारावर आलेल्या मंदीचा परिणाम रेल्वेच्या उत्पन्नावर झाला आहे. औद्योगिक आघाडी सुस्तावल्यामुळे १९६७ च्या एप्रिल ते डिसेंबर ह्या कालातील रेल्वेचे उत्पन्न अंदाजपत्रकात अपेक्षिल्यापेक्षा १७ कोटी रुपयांनी कमी झाले आहे. प्रवाशांपासून मिळणारे, मालाच्या वाहतुकीमुळे मिळणारे आणि इतर उत्पन्न धरून वरील ९ महिन्यांच्या काळात ५९६·६८ कोटी रुपयांचे उत्पन्न झाले. हे उत्पन्न मागील पूर्ण वर्षाच्या उत्पन्नाशी तुलना करता ३३·५ कोटींनी जास्त आहे. परंतु उत्पन्नवाढीचा वेग अपेक्षेप्रमाणे राहिलेला नाही. ह्या वर्षी हिंदी रेल्वे ८० लाख टन अधिक मालाची वाहतूक करील असा अंदाज होता. हा अंदाज तर फसलाच, पण गेल्या वर्षाच्या ह्याच काळात करण्यात आलेल्या वाहतुकीपेक्षा १० लाख टन कमी मालाची वाहतूक करण्यात आली. मालाच्या वाहतुकीसाठी असणारा डब्यांचा पुरवठा मागणीच्या मानाने एकंदरीत अधिक होता. मालाच्या वाहतुकीपासून होणाऱ्या प्राप्तीचे ठोक उत्पन्न ३५·२१ कोटी रुपयांनी वाढले. १९६५–६६ साली ते ७३३·५७ कोटी रुपये होते. १९६६-६७ साली ते ७६३·७३ कोटी रुपये आले. मालवाहतुकीच्या खर्चातही ३९·७७ कोटी रुपयांची वाढ झाली. १९६६ सालाशी तुलना करता १९६७ सालातील डिसेंबर महिन्यात प्रवाशांच्या संख्येत २·८१ टक्क्यांनी घट झाली. परंतु चालू वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांतील प्रवाशांची संख्या गेल्या वर्षातील ह्याच सालावधीच्या मानाने २·६३ टक्यांनी वाढली. ह्या चित्रावरून रेल्वेचे दर वाढण्याची शक्यता दिसते.

## अन्नोत्पादनाची लढाई मनुष्य हरला आहे

कॅलिफोर्निआ विद्यापीठातील जीवनशास्त्राच्या एका प्राध्यापकांनी ब्रिटनमधील एका शास्त्रीय मासिकात लेख लिहून अन्नोत्पादन वाढविण्याची लढाई मनुष्य हरला आहे, असे निदान केले आहे. त्यांच्या मताने १९७० ते १९८५ ह्या काळात कोटयवधी लोक भुकेने तडफडून मरणार आहेत. दरम्यानच्या काळात अन्नोत्पादन वाढविण्याचे प्रयत्न कितीही तातडीने केले तरी त्याचा उपयोग होणार नाही. ते म्हणतात की भारतासारख्या काही देशांत अन्नाचे उत्पादन आणि लोकसंख्या ह्यांच्यात काहीच तोल राहिलेला नाही. त्यामुळे अमेरिकेने अशा देशांना अन्नधान्याची मदत देणे थांबवावे. कारण, ही मदत ज्या देशांना मदतीचा उपयोग होईल अशा देशांना देणे अधिक योग्य आहे. सागरापासून प्राणिज अन्न मिळविण्याचे, पेट्रोलपासून प्रथिनयुक्त अन्न तयार करण्याचे अगर वाळवंटाला पाणीपुरवठा करून अन्नोत्पादन वाढविण्याचे प्रयत्न निकटच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने अव्यवहार्य आहेत.

## राजस्थानातील वाळवंटात विपुल पाण्याच्या विहिरी

राजस्थान विद्यापीठात 'अन्नासाठी विपुल पाणी' ह्या विषयावर मध्यवर्ती सरकारचे पाणीपुरवठा व वीजमंत्री डॉ. के. एल. राव ह्यांचे भाषण झाले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, राजस्थानातील वालुकामय थर प्रदेशात विपुल पाणी असणाऱ्या कितीतरी आश्चर्यजनक विहिरी आहेत. ह्या विहिरींतून रोज हजारो गॅलन पाणी शेतीसाठी उपलब्ध होण्यासारखे आहे. जेसलमीरसारख्या दूरच्या भागातही अशा विहिरी आहेत. त्यांपैकी काही विहिरीतून तर दर तासाला २५ ते ३० हजार गॅलन पाणी मिळू शकते. ह्या भागातील काही विहिरी ४०० फूट खोल आणि अवघ्या ३ फूट व्यासाच्या आहेत. तशा प्रकारच्या विहिरी देशात क्वचितच सापडतात. अधिक संशोधन केले तर राजस्थानात पाण्याचे अधिक साठे सापडू शकतील.

## साखर कारखान्यांच्या यंत्रसामग्रीची निर्यात

उद्योगधंद्यांत आलेल्या मंदीची झळ साखर कारखान्यांची यंत्रसामग्री तयार करणाऱ्या कारखान्यांनाही लागली आहे. ह्यावर उपाय म्हणून ही यंत्रसामग्री तयार करणाऱ्या कारखान्यांचा एक गट बनवून त्यामार्फत साखर कारखान्यांची यंत्रसामग्री निर्यात करण्याचा विचार भारत सरकारने चालविला आहे. अशा प्रकारची निर्यात फायदेशीर होण्याची शक्यता आहे. निर्यातीच्या बाबतीत सरकारने मदत करावी अशी संबंधित कारखान्यांची अपेक्षा आहे. भारत सरकार ज्या देशांना कर्ज देते अगर अन्य मदत देते त्या देशांवर भारताकडून साखर धंद्याची यंत्रसामग्री घेण्याचे बंधन घालावे अशी सूचना करण्यात येत आहे.

## सिमेंटच्या कारखान्यासाठी अमेरिकेची मदत

म्हैसूर राज्यातील एका खाजगी मालकीच्या कारखान्याला अमेरिकन सरकार २·०५ कोटी रुपयांचे कर्ज देणार आहे. म्हैसूर सिमेंट लि. हा तो कारखाना असून त्याला प्रथमापासूनच अमेरिकेचे आर्थिक साह्य मिळालेले आहे. बंगलोरपासून सुमारे ८० मैलांवर असलेल्या ह्या कारखान्याने १९६२ साली सिमेंट उत्पादन करण्यास प्रारंभ केला. त्या वेळी त्यांची वार्षिक उत्पादनक्षमता १ लाख टन होती. कारखान्यास मिळालेल्या कर्जामुळे त्याची उत्पादनक्षमता आता ४ लाख टनांपर्यंत वाढेल. म्हैसूर राज्यातील सिमेंटच्या उत्पादनात कारखान्याचा विस्तार झाल्यावर बरीच भर पडणार आहे. जादा उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल राज्यात भरपूर प्रमाणावर आहे.

## डेन्मार्कमधील योगाचा प्रसार

पाटणा येथे भारतीय योगशास्त्राविषयी आस्था असणाऱ्यांचा एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादात युरोप, अमेरिकेतील अनेक जिज्ञासूंनी भाग घेतला. डेन्मार्कहून आलेल्या एका तरुणीचे परिसंवादात शेवटच्या दिवशी भाषण झाले. तिने सांगितले की डेन्मार्कमध्ये युरोपातील कोणत्याही इतर देशांपेक्षा योगशास्त्राचा प्रसार अधिक झपाट्याने होत आहे. डेन्मार्कच्या प्रत्येक गावात एक तरी योगशिक्षणाचे केंद्र आहे. तेथील रेडिओवरूनही योगासनाचे धडे प्रक्षेपित करण्यात येत असतात. तथापि डेन्मार्कमधील लोकांत केवळ योगासनांचीच आवड फैलावत आहे, असे मात्र नाही. योगशास्त्रातील ध्यान-चिंतनाकडेही तेथील लोक आकृष्ट होत आहेत. डेन्मार्कमध्ये योगशास्त्रावरील पहिले पुस्तक १९११ साली प्रसिद्ध झाले होते. आणि ते फारच लोकप्रिय ठरले होते.

---

## उशीरा येणारे मंत्री स्वतःस दंडाची शिक्षा करून घेतात

मंत्रिमंडळाच्या सभेला जो मंत्री उशीरा येईल, त्याने पाच रुपये दंड द्यावा असे म्हैसूर राज्याच्या मंत्र्यांनी ठरविले आहे. अशा रीतीने एकूण १०० रुपये दंड आतापर्यंत जमा झाला आहे. राष्ट्राध्यक्ष डॉ. झाकीर हुसेन ह्यांच्या कार्यक्रमासाठी जावे लागल्यामुळे जरी मुख्य मंत्र्यांना मंत्रिमंडळाच्या सभेस येण्यास उशीर झाला होता, तरी त्यांनी दंड भरला; नियम तो नियम! ह्या दंड योजनेमुळे मंत्र्यांचा मंत्रिमंडळाच्या सभेपुरता तरी वक्तशीरपणा वाढला आहे.

---

## बँक नोटांवरील छायाचित्र रद्द

इंडोनेशिआच्या सेंट्रल बँकेने नव्या बँक नोटा व्यवहारात आणण्यास प्रारंभ केला आहे. ह्या नोटांवर आता इंडोनेशिआचे पदच्युत अध्यक्ष डॉ. सोकर्नो ह्यांचे छायाचित्र नाही. जुन्या नोटांवर डॉ. सोकर्नो ह्यांचे अध्यक्षाच्या पोषाखातील छायाचित्र होते. ह्या नोटा व्यवहारातून काढून घेण्यात येत आहेत.

---

## दुःखद निधन

'सातारी जर्दा' ह्याचे उत्पादक मेसर्स के. एस. गोडबोले या पेढीचे मालक श्री. बलवंत विनायक ऊर्फ बाळाजी विनायक गोडबोले ह्यांचे दुःखद निधन झाले.

सातारी जर्दा ह्याचे उत्पादन करण्यात मे. के. एस. गोडबोले ही पेढी प्रमुख आहे. श्री. बाळाजीराव गोडबोले यांचे निधनसमयी वय पस्तीस वर्षांचे होते. त्यांचा मनमोकळा व उदार स्वभाव होता. त्यांच्या मागे त्याचे ऐंशी वर्षांचे वडील, पत्नी, एक मुलगी व दोन मुलगे आहेत.

---

तारेचा पत्ता "मॉर्गेज"
मुख्य कार्यालय दूरध्वनी क्र. २६१४९७
उपकार्यालय दूरध्वनी क्र २५६५२७

मुंबई राज्य सहकारी
भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेटस्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले, व्यवस्थापक
ये. स. बोरगांवकर कार्यकारी संचालक

व्यक्तिगत जिव्हाळ्याने बँकिंगचे
सर्व व्यवहार केले जातात
म्हणून
विविध ठेवी योजनांसाठी
दि युनायटेड
वेस्टर्न
बँक लि.
कोणत्याही शाखेत भेटा.

### सामाजिक आणि राजकीय अस्थैर्याचा उगम

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या व्यापार आणि विकास परिषदेचे अधिवेशन दिल्ली येथे भरविण्यात आले होते. ह्या परिषदेचा अहवाल नुकताच प्रसिद्ध करण्यात आला आहे. परिषदेच्या सरचिटणिसांनी जगातील आर्थिक विकास एकोप्याने साधण्यात आला पाहिजे असे मत व्यक्त करून, तसे न झाल्यास उत्पन्न होणाऱ्या धोक्याबद्दल इषाराही दिला आहे. ते म्हणतात की, आज जगात श्रीमंत देश आणि गरीब देश ह्यांच्यातील तफावत अधिकच वाढत चालली आहे; आणि त्याचा परिणाम म्हणून विकसनशील देशांत सामाजिक आणि राजकीय अस्थैर्य निर्माण होत आहे. आर्थिक आणि सामाजिक विकास साधताना काही ताण पडणे स्वाभाविक असते. परंतु ह्या ताणांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती औद्योगिक दृष्ट्या प्रगत झालेल्या देशात असते. विकसनशील देशात मात्र ह्या शक्तीचा अभाव असतो. त्यामुळे बरेचसे विकसनशील देश प्रवाहपतित झालेले आहेत. गरीब देश आणि श्रीमंत देश ह्यांनी परस्परांतील तफावत भरून काढण्याचे प्रयत्न केले पाहिजेत; नव्हे तसे करणे दोघांच्याही आर्थिक व राजकीय हिताचे आहे. आर्थिक भरभराट घडवून आणण्यासाठी स्वतःच्या प्रयत्नांना पहिले स्थान आहे, ही गोष्ट विकसनशील देशांनी लक्षात ठेवली पाहिजे. पण त्याचबरोबर प्रगत देशांनी विकसनशील देशांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी जरूर असणारी मदत देण्याची तयारी दाखविली पाहिजे. अशा सहकार्याचे फायदे प्रगत देशांना लवकर जाणवणारे नसले तरी ते पुढे अनुभवास येतील.

---

### भांडवली मालाची आणि तांत्रिक ज्ञानाची निर्यात

आर्थिक विकास साधण्यासाठी भारत प्रगत देशांकडून भांडवली माल आणि तांत्रिक ज्ञान ह्यांची आयात करतो. प्रगत देशांच्या तुलनेने भारत मागासलेला आहे. त्याचप्रमाणे भारताचे अनेक शेजारी भारताच्या मानाने अप्रगत आहेत. त्याचा फायदा घेऊन भारताला भांडवली माल आणि तांत्रिक ज्ञान ह्यांची निर्यात करता येणे शक्य आहे. युगांडामध्ये भारताने एक मोठा साखर कारखाना उभारण्याचे कंत्राट मिळविले आहे ते ह्याच शक्यतेचे द्योतक आहे. हे कंत्राट मिळवितांना भारताला परदेशाच्या स्पर्धेला तोंड द्यावे लागले. केनिआमध्ये एक कागदाचा कारखाना काढण्यासाठी भारत मदत देत आहे. सध्या एंजिनिअरिंगच्या धंद्यात मंदी आहे, ती उठविण्याच्या कामी अशा निर्यातीचा उपयोग होईल.

**पहिली पाणबुडी**—भारताने आपल्या नाविक दलात सहा पाणबुड्यांचा समावेश करण्याचे ठरविले आहे. त्यापैकी पहिली पाणबुडी दलात सामील झाली असून सध्या ती कवायतीत भाग घेत आहे. पाणबुड्यांच्या युद्धांत भाग घेणाऱ्या पहिल्या खलाशाच्या गटाचे शिक्षणही अलीकडेच पुरे झाले आहे. हिंदी नाविक दलातील पाणबुड्यांसाठी तळ बांधण्याचे काम सुरू झालेले आहे. नाविक दलात पाणबुड्या आल्या म्हणजे हिंदचे नाविक दल परिपूर्ण होईल.




प्रसिद्धि संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.